
शुक्रवार, १७ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३३०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## राज्यात कोरोनाच्या सक्रिय रुग्णांमध्ये विक्रमी वाढ



**मुंबई :** कोरोनाने राज्यात पुन्हा हाहाकार माजवला आहे. राज्यात गुरुवारी (दि. १६) यंदाच्या वर्षातील विक्रमी रुग्णवाढ झाली आहे. नेहमीप्रमाणे राज्यातून मुंबईत सर्वाधिक रुग्णांचे निदान झाले. बीए ५ या नव्या व्हेरिएंटचे रुग्णही आढळले आहेत. तर सक्रिय रुग्णांचा आकडा हा २० हजार पार गेला आहे. त्यात बीए ५चे आणखी चार रुग्ण राज्यात आढळल्याने टेन्शन वाढले आहे. राज्यात यंदाच्या वर्षातली विक्रमी कोरोना रूग्णवाढ झाली आहे. गुरुवारी दिवसभरात चार हजार २५५ कोरोनाचे नवे रुग्ण सापडले आहेत, तसेच नव्या व्हेरिएंट बीए ५ची चौघांना लागण झाली आहे, तर कोरोनामुळे तीन जणांचा मृत्यू झाला आहे. चिंताजनक बाब म्हणजे राज्यातील सक्रिय रुग्णांचा आकडा हा २० हजार पार गेला. सध्या २०,६३४ रुग्णांवर कोरोना उपचार सुरू आहेत.

### अंतरंग

तळोजा औद्योगिक वसाहत वाहनतळाच्या प्रतीक्षेत/३
जेएनपीएमध्ये संशयित कंटेनर कस्टमच्या ताब्यात/६
उरणच्या गोशीनरियू कराटेचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश/८



## दहावीचा निकाल आज होणार जाहीर | विद्यार्थ्यांसह पालकवर्गामध्ये उत्सुकता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार १७ जून रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर होणार आहे.

यासोबतच पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय शिक्षण मंडळांमार्फत परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण पुढील संकेतस्थळांवर शुक्रवारी दुपारी १ वा. नंतर उपलब्ध होतील. *msbshse MahaDGIPR* या परीक्षेस १६,३८,९६४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ८,८९,५०६ मुले असून मुलींची संख्या ७,४९,४५८ एवढी आहे. ऑनलाइन निकालानंतर गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज स्विकारण्यात येतील. याबाबतची सविस्तर माहिती, अटी, शर्ती http://verification.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशीदेखील माहिती दिली आहे.


***येथे बघू शकता निकाल** : mahresult.nic.in, sscresult.mkcl.org, mkcl.org, ssc.mahresults.org.in या वेबसाईटवर रोल नंबर आणि आईचे नाव वापरून विद्यार्थी त्यांचे निकाल पाहू शकतात.*

# राजिपच्या १४ शाळांच्या दुरुस्तीला पनवेल महापालिकेची परवानगी

## भाजपच्या पाठपुराव्याला अखेर यश; पंचायत समितीकडे जबाबदारी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या महापालिकेकडे हस्तांतरित न केलेल्या १४ शाळांच्या दुरुस्तीसाठी पंचायत समितीने महापालिकेकडे परवानगी मागितली होती. पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती आवश्यक असल्याची मागणी भाजप कार्यकर्त्यांकडून सातत्याने करण्यात येत होती. त्या शाळांच्या दुरुस्तीसाठी मागितलेली आवश्यक परवानगी महापालिकेने दिली आहे.



पनवेल महापालिका १ ऑक्टोबर २०१६ मध्ये स्थापन झाली, त्यावेळी पूर्वीच्या नगरपालिकेबरोबरच ग्रामीण भागाचाही समावेश करण्यात आला. या ग्रामीण भागातील ५२ रायगड जिल्हा परिषदेच्या शाळा पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट झाल्या, मात्र या शाळा जिल्हा परिषदेने महापालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या नाहीत. त्या शाळांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने महापालिकेने त्याबाबत अनेक वेळा जिल्हा परिषदेकडे या शाळा हस्तांतर करण्याची मागणी केली, पण जिल्हा परिषदेने अद्याप त्या शाळांचे हस्तांतरण केलेले नाही. पावसाळा सुरू होत असल्याने शाळांच्या दुरुस्तीची मागणी भाजपचे कार्यकर्ते आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे करीत होते. (पान २ वर..)

### दुरुस्तीसाठी परवानगी मागितलेल्या शाळा

१. वळवली २. खुटारी ३. कळंबोली ४. पडघे ५. तळोजे पाचनंद ६. पालेखुर्द ७. खिडुकपाडा ८. ओवे कॅम्प ९. ओवेपेठ १०. टेंभोडे ११. ओवे खुर्द १२. तळोजे मजकूर १३. पापडीचा पाडा १४. करवले



*पनवेल महापालिका स्थापन झाल्यावर आम्ही जिल्हा परिषदेकडे सातत्याने पाच वर्षे या ५२ शाळा हस्तांतरित करण्याची मागणी करीत आहोत, पण जिल्हा परिषदेने त्या शाळा हस्तांतरित केल्या नाहीत. पावसाळ्याआधी तरी या शाळांची दुरुस्ती करा, अशी मागणी भाजपचे कार्यकर्ते करीत होते. त्यामुळे मी पंचायत समितीकडे संपर्क साधला असता त्यांनी १४ शाळांची दुरुस्ती जिल्हा नियोजन मंडळ व एसडीआर फंडातून करण्यासाठी निधी मंजूर केला असून त्यासाठी महापालिकेकडे ना हरकत मागितली आहे ती मिळाली नसल्याचे सांगितले. मी महापालिकेच्या संबंधित विभागात विचारले असता, परवानगीचे पत्र नुकतेच दिले असल्याचे समजले. पाऊस सुरू होत असल्याने मुलांचे नुकसान होऊ नये यासाठी पंचायत समितीला लवकरात लवकर काम करण्यास सांगितले आहे.*

**–परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल महापालिका**





## नियोजित नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्याचा ठराव मंजूर

### दिल्लीतील मेळाव्यात आगरी समाजाची आग्रही मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील विविध राज्यांतील, कन्याकुमारी ते जम्मू आणि अमृतसर ते आसामपर्यंतच्या राज्यातील भारतीय लवणकार (आगरी) समाजाच्या प्रतिनिधींचा मेळावा नुकताच दिल्ली येथे झाला.

या मेळाव्यात नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी करून त्यासाठीचा ठराव मंजूर करण्यात आला, तसेच समाज्याच्या विविध मागण्यांसाठी दिल्लीच्या रामलीला मैदानावर दोन लाखांची भव्य जनसभा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तेलंगणचे रामलू सागर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून पंचायत राज्यमंत्री कपिल पाटील उपस्थित होते.

लवणकार (आगरी) समाजाच्या सर्वांगिण विकासाच्या २१ मागण्यांचे निवेदन केंद्र सरकारला दिले आहे, त्याचा पाठपुरावा करणे, या निवेदनात पहिली मागणी, नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, ही आहे. लोकशाही व्यवस्थेत आपल्या समाजाचे शक्ती प्रदर्शन करणे, (पान २ वर..)

### निवडक

**मुंबईत ४० लाखांचे ड्रग्ज जप्त; दोघांना अटक**

**मुंबई :** अमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (दि. १६) मुंबईत दोन आरोपींना अमली पदार्थांची तस्करी करताना अटक केली आहे. त्यांच्याकडून सात हजार २०० कोडीनयुक्त कफ सिरपच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. या बाटल्या भिवंडीतून मुंबईतील विविध भागात पोहोचवल्या जाणार होत्या, असे आरोपींनी सांगितले. या अमली पदार्थांची किंमत अंदाजे ४० लाख रुपये आहे.

**ओव्हरहेड वायर तुटल्याने हार्बर लोकल ठप्प**

**नवी मुंबई :** मानखुर्द ते पनवेलदरम्यान हार्बर मार्गावर ओव्हरहेड वायर तुटल्याने लोकलसेवा गुरुवारी (दि. १६) सकाळी ठप्प झाली. मानखुर्द गोवंडीजवळ ओव्हरहेड वायर तुटल्याने पनवेल ते सीएसटीएम आणि सीएसटीएम ते पनवेल लोकल १५ ते २० मिनिटे उशिराने धावल्या. रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने हार्बर मार्गावरील रेल्वेस्थानकांवर तुफान गर्दी झाली होती.

## मंत्री भुजबळ, वडेट्टीवार ओबीसी समाजासाठी करतात तरी काय?

### भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचा सवाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्य सरकारकडून तयार केल्या जात असलेल्या ओबीसी समाजाच्या इम्पिरिकल डेटामध्ये चुका आहेत, हे उशीरा का होईना कबूल करणारे छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार यांनी आपल्या मंत्रीपदाचे वजन वापरून हा डेटा अचूक होण्यासाठी आता तरी प्रयत्न करावेत. नाहीतर तुमचे मंत्रीपद बिनकामाचे आहे हेच सिद्ध होईल, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. अशा पद्धतीने डेटा सादर झाला तर सर्वोच्च न्यायालयात तो डेटा मान्य करणार नाही. तसे झाले तर विनाआरक्षणाच्या निवडणुका होण्याची भीती आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत गेल्या तीन वर्षांपासून हे सरकार निव्वळ वेळकाढूपणा करीत आहे. राज्य सरकारमधील मंत्री विजय वडेट्टीवार आणि छगन भुजबळ यांनी इम्पिरिकल डेटा चुकीच्या पद्धतीने तयार केला जातो आहे, अशी कबुली नुकतीच दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांचे म्हणणे बरोबरच आहे, असेही भुजबळ, वडेट्टीवार म्हणत आहेत. असे असेल तर हे मंत्री सरकारमध्ये बसून करतात तरी काय? असा प्रश्न निर्माण होतो. इम्पिरिकल डेटामध्ये अशा चुका होत असतील, तर या नेत्यांचा ओबीसी समाजाला काहीच उपयोग नाही.

मागासवर्गीय आयोग तुमच्या सरकारच्या अधिकारात काम करीत आहे, मग एवढ्या मोठ्या चुका कशा होतात? याचा अर्थ सरकारच्या सांगण्यावरूनच या चुका होत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ज्या दिवशी आदेश दिला, त्याच दिवशी डेटा तयार करण्याचे काम सुरू व्हायला पाहिजे होते. आता आडनावावरून डेटा तयार केला जात आहे. ही पद्धत अत्यंत चुकीची आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

### अलिबाग कोळीवाड्यात नियमित पाणीपुरवठा करा

## भाजपचा अलिबाग नगर परिषदेवर मोर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या हद्दीतील कोळीवाड्यात नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा या मागणीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे गुरुवारी (दि. १६) नगर परिषदेवर मोर्चा काढण्यात आला.

अलिबाग कोळीवाड्यात मागील काही महिने अनियमित पाणीपुरवठा होत आहे. अलिबाग नगर परिषदतर्फे दोन दिवसांनी पाणीपुरवठा होतो. हे पाणीदेखील पिण्यास अयोग्य असते. कोळीवाड्यात नियामित व पूर्ण दाबाने पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी येथी नागरिक करीत होते. अनेक निवेदने देण्यात आली. तरीदेखील अलिबाग नगरपरिषदेने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी गुरुवारी अलिबाग नगर परिषदेवर मोर्चा काढून



आपला रोष व्यक्त केला.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. भाजप अलिबाग तालुकाध्यक्ष परशुराम म्हात्रे, अलिबाग शहराध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, ओबीसी सेल अलिबाग तालुकाध्यक्ष अशोक वारगे आदी या मोर्चात सहभागी झाले होते.

अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांची ॲड. महेश मोहिते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून अलिबाग कोळीवाड्यातील पाणीपुरवठा सुरळीत कण्याची मागणी केली. हा मोर्चा शांततेत काढण्यात आला आहे. जर येत्या सोमवारपर्यंत कोळीवाड्यातील पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ॲड. अंकित बंगेरा यांनी यावेळी दिला.

**ज्या वार्डामध्ये विरोधकांची ताकद आहे तिथली समस्या सोडविण्याकडे अलिबाग नगर परिषद जाणूनबूजून दुर्लक्ष करते. अलिबाग शहरात अनेक समस्या आहेत. त्यापैकी पाण्याची समस्या गंभीर आहे. त्यामुळे पाण्यासाठी हा मोर्चा काढला आहे. इतर समस्यांसंदर्भात देखील भाजप आवाज उठवणार आहे.**

**–ॲड. महेश मोहिते, अध्यक्ष, भाजप दक्षिण रायगड**

# पनवेलमध्ये क्रिकेटपटूंसाठी टर्फ मैदानाची उभारणी

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; सभागृह नेते परेश ठाकूर यांचीही उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खेळाडूंचे क्रीडा कौशल्य आणखी वाढावे तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, याकरीता पनवेलमध्ये अनेक सुविधा नव्याने उपलब्ध होत आहेत. त्याअंतर्गत पनवेल तालुका क्रीडा संकुलात 'टर्फफिट'च्या माध्यमातून क्रिकेट खेळाडूंसाठी टर्फचे मैदान उभारण्यात आले आहे. या मैदानाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १५) झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील खेळाडूंना आपल्या कौशल्यांना वावा मिळावा तसेच त्यांच्या कलागुणांना आणखी वाव मिळावा याकरीता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुविधा उपलब्ध होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका क्रीडा संकुलात टर्फफिटचे सिद्धार्थ नाबियर आणि परिक्षित भट यांच्या माध्यमातून क्रिकेट खेळण्यासाठी टर्फचे मैदान उभारण्यात आले आहे. या मैदानाचा उद्घाटन सोहळा बुधवारी झाला.

या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, नितीन पाटील, नगरसेविका हेमलता म्हात्रे, तहसीलदार विजय तळेकर, टर्फफिटचे सिद्धार्थ नाबियर, परिक्षित भट, जिल्हा क्रीडा अधिकारी मनिषा मानकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## 'शेकाप आमदार जयंत पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा'



**अलिबाग : प्रतिनिधी**

पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांना खूर्चीतून उठवणारे शेकापचे आमदार जयंत पाटील यांच्याविरोधात पोलीस बॉईज संघटना आक्रमक झाली आहे. या संदर्भात रायगडचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले आहे. तसे न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

वडखळ येथे प्रस्तावित एमआयडीसीसंदर्भात प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळी पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हे आमदारांच्या रांगेत बसले म्हणून आमदार जयंत पाटील यांनी पोळ यांच्यावर हक्कभंग आणण्याची भाषा वापरली. याबाबत पोलीस बॉईज संघटनेने गुरुवारी आमदार जयंत पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

## टेम्पोचालकाला मारहाण, लुटमार

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील केंबुर्ली गावाजवळ बुधवारी (दि. १५) मध्यरात्री चार जणांनी एका टेम्पोचालकाला शिवीगाळ करून मारहाण करीत त्याच्याकडील २ हजार रुपये लुटून नेल्याची घटना घडली.

शाहीद अली शेख रा. गोवंडी, मुंबई हे आयशर टेम्पो (क्र. एमएच ४८ एजी ८१४०) घेऊन जात असताना केंबुर्ली गावात मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींवरून आलेल्या चार जणांनी शाहीद शेख यांना शिवीगाळ करीत मारहाण केली, तसेच त्यांच्या खिशातून दोन हजार रुपये काढून घेतले. शाहीद अली शेख यांच्या तक्रारीनंतर महाड शहर पोलीस ठाण्यात या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी कंबर कसली

## शिवसेनेला शह देण्यासाठी मास्टर प्लॅन तयार

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने आतापासून तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. १६) भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत मुंबईत एक बैठक पार पडली. या बैठकीत आगामी १८ महिन्यांमधील पक्षाच्या रणनीतीबाबत चर्चा झाली, तसेच महाराष्ट्राच्या जागांच्या संदर्भात एक समितीदेखील तयार करण्यात आली आहे. आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांना समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे. या बैठकीनंतर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारपरिषदेत माध्यमांना या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने लोकसभेच्या काही जागा निवडल्या आहेत, की ज्या जागांवर आम्ही अधिक लक्ष केंद्रित करणार आहोत. त्याबाबत महाराष्ट्रांच्या जागांच्या संदर्भात एक समिती तयार करण्यात आली आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे त्याचा समन्वय करताय. आमचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे हे गुरुवारी या बैठकीसाठी आले होते आणि त्यामध्ये आमची जी पूर्व रणनीती आहे त्याप्रमाणे पुढील १७-१८ महिन्यांच्या सगळ्या रणनीतीबाबत चर्चा झाली. याचे जे प्रभारी आहेत, त्यांची काय भूमिका असणार आहे, त्यांनी कशाप्रकारे काम करायचे आहे याबाबत सगळी माहिती देण्यात आली. मला असे वाटते की भाजपाचे हे एक नियमित काम आहे. २०१४ मध्ये निवडून आल्यानंतरही अशाच प्रकारे २०१६-१७ पासून एक नवीन मिशन आम्ही हातात घेतले होते, तसेच हे मिशन आहे. केवळ निवडणुकीच्या काळात तयारी करायची असे नाही, तर सातत्याने ती तयारी झाली पाहिजे आणि लोकांशी संपर्क असला पाहिजे.

योजना लोकांपर्यंत पोहचताय की नाही? लोकांना त्याचा लाभ मिळतोय की नाही? लाभधारकांशी संपर्क होतोय की नाही? अशा अनेक गोष्टी यामध्ये आहेत, की ज्या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली, तसेच जे मतदारसंघ आम्ही जिंकलो आहोत, त्यावर लक्ष आहेच, परंतु आपल्याला नव्याने जे जिंकायचे आहेत, असेदेखील काही मतदारसंघ आम्ही निवडले आहेत असेही ते म्हणाले.

### आमची ४८ मतदारसंघातही तयारी राहणार : देवेंद्र फडणवीस

**४८ मतदारसंघात आम्ही ताकदीने लढू, या अगोदर आम्ही दाखविलेले आहे. ४२ मतदारसंघ जिंकणे हे काही सोपं काम नाही, ते आम्ही जिंकलेलो आहोत. त्यामुळे आपल्याला विश्वास आहे की, ४८ मतदारसंघात आमची तयारी असणार आहे आणि आम्ही जिंकण्याचा प्रयत्न करू, असेही देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखविले.**

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

जा.क्र. : कुबनप/साबां/५०८६/२०२२-२३ दिनांक :- १६/०६/२०२२

**जाहिर ई-निविदा सुचना क्र. ४७/२०२२-२३ (शुध्दीपत्रक)**

**संदर्भ :- दि.१५/०६/२०२२ च्या रोजी जाहिर ई-निविदा सुचना क्र.४७/२०२२-२३ वर्तमानपत्रात प्रसिध्दी**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत नगरपरिषदेच्या निधीतून अग्निशमन केंद्र दुरुस्ती करणे दि.१५/०६/२०२२ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी करण्यात आली होती. त्याऐवजी बांधकाम विभागाच्या पायाभूत सुविधाच्या २ कामांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. याबाबतचे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे. इतर मजकूर मध्ये कोणाताही बदल करण्यात आलेला नाही. सदर कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.१५/०६/२०२२ ते दि. २३/०६/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि.२४/०६/२०२२ रोजी दुपारी १२.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in किंवा तसेच शासनाच्या htt://mahatenders. gov .in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगांव**

## खोपोली-पेण मार्गावर कारची दुचाकीला धडक : दोघे जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

कार चालकाने अचानक वळण घेतल्याने दुचाकीला धडक बसून, मृणाल मंगेश शिंदे (वय २५ , रा. सारसन, ता. खालापूर) आणि केतन म्हसे (रा. वडवळ) हे दोघेजण जखमी झाले आहेत. अपघाताची घटना खोपोली-पेण राज्यमार्गावर डोणवत गावाच्या हद्दीत घडली.

केतन आणि मृणाल दोघेजण दुचाकी (एमएच-४६, बीएक्स-२३३१) वरून पेण-खोपोली रस्त्याने सारसन बाजूकडे निघाले होते. केतन दुचाकी चालवत होता तर मृणाल मागे बसला होता. डोणवत गावाच्या हद्दीत खोपोली बाजुकडे जाणाऱ्या कार (एमएच-०४,जीयु-०८४६) चालक गोरखनाथ भगवान वाघमारे (वय २८, रा मिरकुटवाडी, ता. खालापूर) याने कोणत्याही प्रकारे इंडिकेटर न लावता कार अचानक उजव्या बाजुला वळविली. त्यामुळे कारची दुचाकीला धडक बसली. या अपघातामध्ये मृणाल आणि केतन यांना दुखापत झाली. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात कार चालक गोरखनाथ विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक जयेश कुथे हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## द्रुतगती मार्गावर दोन ट्रकचा अपघात

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली हद्दीत गुरुवारी (दि. १६) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास सिमेंटची वाहतूक करणाऱ्या ट्रकला तांदुळ वाहतूक करणाऱ्या ट्रकने मागून जोरदार धडक दिली. अपघातात मागील ट्रकच्या केबिनमध्ये चालक व क्लिनर अडकून पडले होते. अपघातानंतर द्रुतगती मार्गावरील वाहतूक काही काळ खंडित झाली होती.

अपघाताचे वृत्त समजताच आयबी यंत्रणा, देवदूत, डेल्टा फोर्स, महामार्ग व खोपोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी केबिनमध्ये अडकलेल्या चालक व क्लिनर यांना सुरक्षित बाहेर काढले. जखमी चालक व क्लिनरला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या अपघातानंतर द्रुतगती मार्गावरील वाहतूक जुन्या महामार्गावर वळविण्यात आल्याने खोपोली शहरातील शिळफाटा येथे प्रचंड वाहतूककोंडी झाली होती. दरम्यान दोन्ही अपघातग्रस्त वाहने बाजूला केल्यानंतर सुमारे तीन तासानंतर वाहतूक सुरळीत करण्यात यंत्रणेला यश आले. या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- नेरे, तालुका - पनवेल, जिल्हा- रायगड येथील खालील वर्णनांकित मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. मेघनाथ सुदाम पाटील,** यांचे खुद्द मालकी व ताबेकब्जातील त्यांनी आमचे अशीलांने कायम स्वरूपी खरेदी देण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी आमचे अशीलांनी मिळकतीचे विद्यमान मालकाबरोबर केली आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- नेरे, तालुका - पनवेल, जिल्हा- रायगड**

| अ. न. | गावाचे नाव | विद्यमान मालक/ कब्जेदाराचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|
| १. | नेरे | श्री. मेघनाथ सुदाम पाटील | २६ | ०.२५.३०<br>पो.ख ०.०२.५०<br>एकूण क्षेत्र. ०.२७.८० |

सदरहू वर नमूद केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबेकब्जात आहे असे ७/१२ उताऱ्यावरून निदर्शनास येते. तरी वर नमूद मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, संस्थांचा ताबा, बयाणा, साठेकरार, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, इजमेंट अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारची कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकाच्या लाभात सोडून दिला आहे असे गृहीत धरून आमचे अशिलांकडून सदर मिळकतीचे फरोक्त खत नोंदणीकृत केले जाईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही तक्रारीचा अथवा हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसीद्वारे नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : १७.०६.२०२२

**सही/-**
**ॲड. शेखर पा. पाटील**
पत्ता :- शॉप नं.१६, सत्यम आर्केड. प्लॉट नं. १६, सेक्टर-१५,सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया समोर, कामोठे, पनवेल -४१०२०९.

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि.रायगड**

कार्यालय :- अग्निशमन इमारत, १ला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१० २०६
दूरध्वनी क्र. ०२२२७४५८०४०/४१४२ Email Id : panvelcorporation@gmail.com

पमपा/DAYNULM/SUSV/२४२२/प्र.क्र. ०६/२७/२०२२ दिनांक :- १५/०६/२०२२

**जाहीर आवाहन**

**प्रधानमंत्री स्वनिधी योजना (PM SVANidhi)**
**पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना**

कोविड - १९ (साथीचा रोग) सर्वत्र पसरलेला असल्यामुळे आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या टाळेबंदीमध्ये (lockdown) अर्थव्यवस्था कोलमडल्यामुळे पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरीत परिणाम झाला आहे. पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVANidhi) पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजना सुरु केली आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेची महाराष्ट्र राज्यात यापुर्वी अंमलबजावणी सुरु झाली आहे.

सदर योजने०द्वारे शहराअंतर्गत व्यवसाय करणारे सर्व फेरिवाले, लहान विक्रेते, व्यावसायिक इ. ना विनातारण सुक्ष्म पतपुरवठा होणार असल्यामुळे शहराच्या आर्थिक चलनवलनाचा दर वाढून एकुण अर्थव्यवस्थेला बळकटी येण्यास मदत होणार आहे. त्यामुळे आयुक्त पनवेल महानगरपालिका या नात्याने मी महानगरपालिकेच्या सर्व पदाधिकारी, नगरसेवक व सर्व लोकप्रतिनिधीना तसेच फेरिवाला समिती सदस्य, संघटना या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व घटकांना शहरातील फेरीवाले विक्रेते लहान व्यावसायिक उदयोजक यांना या योजनेत अधिक प्रमाणात सहभागी होऊन शहराच्या आर्थिक विकासाला चालना देण्याचे आवाहन करत आहे.

सदर योजना हि दि. २४/३/२०२० रोजी व त्यापुर्वी शहरामध्ये पथविक्री करिता असलेल्या सर्व पात्र पथविक्रेत्यांना लागू असून याबाबत पुढील गटात मोडणारे विक्रेते विहीत पध्दतीने अर्ज केल्यास खेळते भांडवल कामी रु. १०,०००/- चे कर्ज घेण्यास पात्र ठरणार आहेत.

१. महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण करुन त्यांना विक्री प्रमाणपत्र/ओळखपत्र/दिलेले पथविक्रेते.
२. महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आढळलेले परंतु त्यांना विक्री प्रमाणपत्र/ओळखपत्र दिले गेले नाही.
३. महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात जे पथविक्रेते वगळलेले आहेत किंवा ज्यांना सर्वेक्षण झालेले नाही असे पथविक्रेते.
४. महानगरपालिकेच्या आसपासच्या ग्रामीण भागातील जे पालिका क्षेत्रात पथविक्री करतात असे पथविक्रेते.

या निधीतून कर्ज उपलब्ध होऊन छोटे व्यवसाय फेरीवाले व अन्य विक्रेते यांना आर्थिक पाठबळ मिळून शहरातील आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होणार आहे. नागरी पथविक्रेत्यांना १ वर्षाच्या परतफेड मुदतीसह रु. १०,०००/- पर्यंतचे खेळते भांडवल कर्ज घेण्यास आणि त्याची दरमहा हप्त्याने परतफेड करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सदर कर्ज हे विनातारण आहे. ज्या पथविक्रेत्यांनी पहिल्या टप्प्यातील रु. १०,०००/- कर्जाची रक्कम वेळेवर किंवा वेळेच्या आत परत फेड केली आहे, अशा पथविक्रेत्यांना पुढील टप्प्यातील रु. २०,०००/- मात्र चे कर्ज या योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

व्याजदर बँकांच्या प्रचलित व्याजदराप्रमाणे तसेच RBI च्या मार्गदर्शक सुचनांनुसार लागू राहतील. सदर योजनेंतर्गत कर्जाचा लाभ घेणारे पथविक्रेत्यांनी विहित कालावधीमध्ये नियमित परतफेड केल्यास ते ७ % व्याज अनुदान मिळण्यास पात्र होतील. व्याजाच्या अनुदानाची रक्कम अर्जदाराच्या खात्यामध्ये तिमाहीप्रमाणे जमा केली जाईल. सदर योजनेमध्ये डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल माध्यमातून व्यवहार करणाऱ्या विक्रेत्यांना अतिरिक्त कॅशबॅकची सुविधा देखील देण्यात येत आहे. योजनेचा लाभ घेणेसाठी ऑनलाईन पध्दतीने www.pmsvanidhi.mohua.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे.

- अर्ज भरण्याकरिता आवश्यक कागदपत्रे

१) आधारकार्ड (मोबाईल क्रमांकाशी लिंक असणे आवश्यक)
२) रेशन कार्ड
३) मतदान कार्ड
४) बँक पासबुक
५) फेरीवाला असल्याबाबत पुरावा. (फेरीवाला सर्वेक्षण झाले असल्यास त्याची पावती/ बाजार फी वसुली पावती / फेरीवाले दडांत्मक पावती)
६) पासपोर्ट साईज फोटो

- अधिकाधीक नागरीकांपर्यंत या योजनेचा लाभ पुरविणेकामी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयात महापालिकेमार्फत अर्ज भरण्याकरिता सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. प्रभाग निहाय संपर्क अधिकाऱ्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

१) श्री. जितेंद्र मढवी, प्रभाग समिती 'अ', खारघर (संपर्क क्र. ९८१९९९८७८८ )
२) श्री. सदाशिव कवठे, प्रभाग समिती 'ब', पनवेल (संपर्क क्र. ९८१९६३३१७४)
३) श्री. अरविंद पाटील, प्रभाग समिती 'क', कामोठे (संपर्क क्र. ९३२२३५१८९७ )
४) श्री. अमर पाटील, प्रभाग समिती 'ड', (संपर्क क्र. ९८३३७३६९८९)

तसेच महानगरपालिका हद्दीतील सर्व CSC केंद्रामध्ये हे Online अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्षातील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधता येईल.

१) श्रीम. विनया म्हात्रे. (संपर्क क्र. ८०९७०४४८४४)
२) श्री. नवनाथ थोरात. (संपर्क क्र. ९८५०७२५५८४)

तरी पनवेल महानगरपालिका हद्दीत असणाऱ्या, फेरीवाला सर्वेक्षणात समाविष्ट असणाऱ्या, सर्वेक्षणातून सूटलेल्या तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रात व्यवसायाकरिता येणाऱ्या तथापी लगतच्या ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या अशा सर्व फेरीवाला, लहान विक्रेते, भाजी, फळे, फुले अथवा तत्सम सर्व व्यावसायीक यांनी अधिकाधिक प्रमाणात या योजनेद्वारे कर्जाचा लाभ घ्यावा व व्यवसाय स्थिर करावा.

**सही/-**
**श्री. कैलास गावडे**
**मा. उप आयुक्त**

**सही/-**
**श्री. गणेश देशमुख**
**मा. आयुक्त**

## खोपोलीत तोतया पोलिसांचा वावर

### एक लाख २० हजाराचे दागिने लंपास

**खोपोली :** वयोवृद्ध व्यक्तीला तोतया पोलिसांनी गंडा घालण्याची घटना खोपोली बाजारपेठेत घडली असून सुमारे एक लाख वीस हजार रुपये किंमतीचे दागिने लंपास केले आहेत.

खोपोलीतील शास्त्रीनगर येथे राहणारे वयोवृद्ध हे शहरातील बॅक ऑफ इंडियामध्ये पायी चालले होते. त्या वेळी तीन अनोळखी इसमांपैकी एकाने त्यांना थांबवून तो पोलीस असल्याचे सांगितले. तुम्ही वयस्कर आहात. एवढे दागिने घालून फिरु नका, दागिने तुमच्या रुमालात बांधून घ्या, असे तोतया पोलिसांनी त्यांना सांगितले. तसेच त्यांच्या दोन सोन्याच्या अंगठ्या व दोन सोन्याच्या चैन रुमालात बांधून देण्याचा बहाणा करुन हातचलाखीने काढुन घेतल्या.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M )/DIVN/MHD/ Tech/Tender-31/2022-23 Dtd. 17.06.2022 Rfx No. 7000023630** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for providing and fixing of LED fixtures at various substation under EHV (O&M) Dn. Mahad. | **Rs. up to 11,89,112/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 17.06.2022 @ 00:00 hrs. to 23.06.2022 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn. Mahad**

### पान १ वरून

## राजिपच्या १४ शाळांच्या दुरुस्तीला पनवेल महापालिकेची परवानगी

याबाबत पनवेल पंचायत समितीकडे संपर्क साधला असता, पनवेल पंचायत समितीने या शाळा महापालिका हद्दीत येत असल्या तरी त्या शाळांच्या इमारती जिल्हा परिषदेच्या मालकीच्या असल्याने यातील १४ शाळांची दुरुस्ती जिल्हा नियोजन मंडळ व एसडीआर फंडातून करण्यासाठी निधी मंजूर करून दुरुस्तीसाठी महापालिकेकडे ना हरकत मागितली असल्याचे सांगितले. त्याला पनवेल महापालिकेच्या शिक्षण व बांधकाम खात्याने मंजुरी दिली आहे.

## नियोजित नवी मुंबई विमानतळाला 'दिबां' चे नाव देण्याचा ठराव मंजूर

आपल्या मागण्यांसाठी केंद्रस्थानी बसलेल्या सत्ताधाऱ्यांच्या कानी आवाज उठवणे व त्या मान्य करुन घेणे, समाजाचा पौराणिक असा गौरवशाली इतिहास देशासमोर प्रस्तुत करणे, या उद्देशाने ही दोन लाखांची जनसभा घेण्यात येणार असल्याचे नवी दिल्ली संयोजक कृष्णकुमार भारती यांनी सांगितले.

या मेळाव्यास श्री श्री जगद्गुरु पुरुषोत्तम आनंदपुरीजी महास्वामी, कर्नाटक, महाराष्ट्रातून अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, कार्याध्यक्ष जे. डी. तांडेल, भिवंडी आगरी समाजाचे अध्यक्ष अरुण पाटील उपस्थित होते. तर उत्तर प्रदेशातून दिलीपसिंग चव्हाण, जगदीशसिंह चव्हाण, हरियाणा, गिरी परमा, आंध्र प्रदेश, रेणुका, कर्नाटक, सिसोदिया, हरयाणा, के. एल. चव्हाण, उत्तर प्रदेश, ॲड. कुमार पाटील, महाराष्ट्र, मनोजकुमार चव्हाण, दिल्ली, यांनी मेळाव्याला मार्गदर्शन केले. मेळाव्यास २१ राज्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/ MHD/ Tech/Tender-28/2022-23 Dtd. 07.06.2022 Rfx No. 7000023474** | **Sub :-** Extension for SRM E-tender for providing various consumables items for pre monsoon maintenance at various locations under Mahad Dn. for the year 2022-23. | **Rs. up to 485325/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 17.06.2022 @ 00:00 hrs to 23.06.2022 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn. Mahad**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender-29/ 2022-23 Dtd. 04.06.2022 Rfx No. 7000023461** | **Sub :- Extension** for SRM E-Tender for weed control along with initial chemical treatment & rodent control treatment 220kV Mahad S/s 220kV Vile Bhagad S/s, 220kV Kandalgaon S/s, 100kV Roha S/s & 100kV Mhasala S/s under EHV (O&M) Division Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 6,52,241/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 17.06.2022 @ 00:00 hrs. to 23.06.2022 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या कोंबडभुजे येथील सिडकोच्या जमिनीवरील बांधकाम क्र. KB-२४१ हे श्री. सदाशिव बाबू कोळी यांचेकडून संपादित झालेले आहे. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. ३०९, सेक्टर-२५, क्षेत्र-२१० चौ. मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | बांधकाम क्र. | सहबांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| कोंबडभुजे | KB-२४१ | **श्री. सदाशिव बाबू कोळी (मयत) वारस**<br>१) श्री. संदेश सदाशिव कोळी<br>२) सौ. दर्शना राजन कोळी | ६७.८१ | पुष्पक वहाळ | २५ | ३०९ | २१० |

श्री. सदाशिव बाबू कोळी हे मयत आहेत व त्यांचे वारसांपैकी १) सौ. दर्शना राजन कोळी यांनी १) श्री. संदेश सदाशिव कोळी यांना इरादित भूखंड क्र. ३०९, सेक्टर-२५, क्षेत्र-२१० चौ. मी. हिस्स्याचे हक्कसोड पत्र लोक आदालत पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे. मु. न. २८५/२०२१ हे सादर केले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे भूखंड क्र. ३०९, सेक्टर-२५, क्षेत्र-२१० चौ. मी. यामधील श्री. सदाशिव बाबू कोळी यांचे वारसांनी त्यांचा हिस्सा श्री. संदेश सदाशिव कोळी यांस देण्यास संमती दिली आहे व तसेच न्यायालयाने श्री. संदेश सदाशिव कोळी यांच्या लाभात रे. मु. नं. २८५/२०२१ अन्वये हक्कसोड बाबत आदेश पारित केलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत / तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ) तळ मजला, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्यता कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१११/२०२२-२३

# तळोजा औद्योगिक वसाहत वाहनतळाच्या प्रतीक्षेत

## कारवाईनंतरही रस्त्याच्या दुतर्फा बेकायदा पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये गेल्या पाच महिन्यांत ४,२९६ वाहनांवर बेकायदा ठिकाणी वाहने उभी केल्याने दंडाची कारवाई केली असून यामुळे वाहतूक विभागाकडे चार लाख ३५ हजार रुपयांचा महसूल जमा करण्यात आला आहे. या कारवाईनंतरही रस्त्याच्या दुतर्फा बेकायदा पार्किंगचा प्रश्न कायम आहे. यामुळे उद्योजकांकडून संताप व्यक्त होत आहे.

दुसरीकडे कारवाई होत असल्याने वाहनचालकही त्रस्त असून वाहनतळच नाही तर वाहने कुठे उभी करायची असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. असा पेच निर्माण झालेला असतानाही तेथील वाहनतळाचा प्रश्न सुटलेला नाही. साडेसातशेहून अधिक कारखाने तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये आहेत. यामध्ये दिवसाला २० हजारांहून अधिक वाहनांची ये-जा असते. सात हजारांहून अधिक अवजड वाहने दररोज ये-जा करतात. असे असताना वाहनतळच नसल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे रस्त्यावर जागा मिळेल तेथे वाहने उभी केली जात आहेत. यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताच्या घटना घडत आहेत.

आठ महिन्यांपूर्वी दोन युवकांचा यामुळेच अपघातात बळी गेल्याची घटना घडली आहे. या घटनेतून कोणताही बोध घेतलेला नसून अजूनही वसाहतीमध्ये सर्वाधिक धोकादायक असलेली अमोनियाने भरलेले टँकर टीएमएचे कार्यालय असलेल्या रस्त्याकडेला दुतर्फा उभे केले जात आहेत. याचा लघु उद्योगांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाल्याची तक्रार या परिसरातील उद्योजक व टीएमएचे सदस्य दिलीप परुळेकर यांनी केली आहे. दीपक फर्टिलायझर या कंपनीत अमोनिया घेऊन आलेले टँकर रस्त्याच्या दुतर्फा उभे असतात. त्यांच्यावर वाहतूक पोलिसांची सातत्याने कारवाई करण्यात येत असल्याचे तळोजा वाहतूक विभागाचे पोलीस अधिकारी महेश पाटील यांनी सांगितले.

**तळोजामध्ये अवजड वाहनांसाठी वाहनतळाचे काम पूर्ण होण्यासाठी अजून काही महिने लागणार आहेत. टीएमएतर्फे तळोजात वाहनतळ उभे करण्यासाठी अनेक वर्षे पाठपुरावा सुरू आहे.**

**-शेखर श्रृंगारे, अध्यक्ष, टीएमए**



पनवेल : भाजपचे खारकोपर गावअध्यक्ष सुधीर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी रामदास ठाकूर, वसंत पाटील, अनंत ठाकूर, कांबळे गुरुजी, जयवंत देशमुख, दामोदर भोईर, पी. के. ठाकूर, वी. के. ठाकूर, भाऊ भोईर, भार्गव भोईर, आशिष घरत, चंदन ठाकूर, मेघनाथ ठाकूर, संजय कोळी आदी उपस्थित होते.



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या लाईफवर्कर व गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या उपशिक्षिका ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसनिमित्त न्हावेखाडी येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीवार्द घेतले. या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत पाटील, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, निलेश खारकर, किशोर पाटील, बी. टी. कांबळे, सी. एल. ठाकूर, मदन ठाकूर आदी उपस्थित होते.





उरण : आमदार महेश बालदी यांच्या ९,९१,००० रुपयांच्या निधीतून आवरे तलाव परिसरात सुशोभिकरण करण्यात आले आहे. त्याबद्दल आवरे ग्रामस्थांनी भाजप शिष्टमंडळामार्फत आमदार महेश बालदी यांचे आभार मानले आहेत.



खारघर : पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सेक्टर ४ येथील शांतीकुंज सोसायटी व अर्जुन सोसायटीच्या फुटपाथावरील गटारांची साफसफाई सुरू करण्यात आली आहे. या कामाची भाजप नेते प्रभाकर घरत यांनी पाहणी केली.

# पोसरी ग्रामपंचायतीमार्फत लाभार्थ्यांना जीवनावश्यक वस्तू व धनादेशाचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पोसरीच्या १५ टक्के मागासवर्गिक निधी अंतर्गत लाभार्थ्यांना ५००० रुपयाचे धनादेश व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास सरपंच संगीता तोंडे, उपसरपंच सतीश पाटील, ग्रामपंचायत सदस्य बंडू शिद, रामदास भोईर, माजी सरपंच सुनीता शिद, भावना जोशी, राजश्री देसाई, ग्रामसेवक अंकुश पाटील, पोसरी भाजपा गाव अध्यक्ष भरत पाटील, भाजप गुळसुंदे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुजित पाटील, कमलाकर शिद, माजी उपसरपंच लक्ष्मण अवाटे, युवा कार्यकर्ते रोहिदास तोंडे व ग्रामपंचायत कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

दरम्यान, नवनिर्वाचित सरपंच संगिता तोंडे व सर्व ग्रामपंचायत कमिटीचे या स्तुत्य उपक्रमाबद्दल लाभार्थांनी आभार मानले.



# जासई विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव गुणवंत विद्यार्थी, प्राध्यापकांचा सत्कार



**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेशोत्सव व इयत्ता बारावी विज्ञान व कला शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ झाला.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि कामगार नेते सुरेश पाटील तसेच स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन अरुण जगे यांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांनी केले. ज्युनिअर कॉलेजचा कला व विज्ञान या दोन्ही शाखांचा इयत्ता बारावीचा निकाल यावर्षी १०० टक्के लागला आहे. त्यानिमित्ताने मान्यवरांनी विद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक वर्गाचे अभिनंदन केले, तसेच बारावीमध्ये विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी प्रणिता मोटे (७०.१७), द्वितीय क्रमांक शुभांगी नवांदे (६९.१७), तृतीय क्रमांक दिया पाटील (६७.५०) तसेच कला विभाग प्रथम क्रमांक सुहानी इंगोले (६७.६७), द्वितीय क्रमांक सुप्रिया घुटुकडे (६२.८३), तृतीय क्रमांक स्वाती माने (६२.३३) या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केला गेला. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी मानले.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजमध्ये सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत इयत्ता पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिजवून मध्यान्ह भोजन देण्यास सुरुवात झाली.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना शुद्ध, ताजे व रूचकर आणि स्वादिष्ट मध्यान्ह भोजन शिजवून देण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या शालेय पोषण आहार योजनेचे प्रमुख व संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व सहायक पोषण आहार प्रमुख एकनाथ ठाकूर यांनी दिली.

ताज्या व गरमागरम पोषण आहारावर अतिशय तृप्त मनाने ताव मारताना विद्यार्थी दिसत होते. विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके, लेखनिक चंद्रकांत मढवी, सर्व वर्गशिक्षक व इतर शिक्षक व सेवक यांचे शालेय पोषण आहार योजनेस विशेष सहकार्य लाभत असल्याचे एकनाथ ठाकूर यांनी सांगितले.

# भोकरपाडा येथे विद्यार्थ्यांना छत्र्या, शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने बुधवारी (दि. १५) पनवेल तालुक्यातील भोकरपाडा रायगड जिल्हा परिषदेतील शाळेच्या विद्यार्थ्यांना छत्र्यांचे आणि शालोपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

मंचाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्यांचे आणि छत्री यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंचाचे सरचिटणीस मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. मंचाच्या वतीने मुलांना वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी असे शैक्षणिक साहित्य देण्यात आले, तसेच छत्र्या देण्यात आल्या.

या वेळी खजिनदार नितीन कोळी, विवेक पाटील, संजय कदम, अविनाश कोळी, राजू गाडे, भरतकुमार कांबळे,साजन फुलोरे, हनुमान फुलोरे, माजी उपसरपंच धनंजय पाटील, सुनिल राठोड, शाळेच्या शिक्षिका समृद्धी सुधीर पाटील,शिक्षक प्रकाश राजगे आदी उपस्थित होते.



# महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे पनवेलकरांकडून स्वागत

**पनवेल : प्रतिनिधी**

सर्वसामान्य घटकातील मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे या हेतूने महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासुन इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यात येत आहे. या शाळेच्या ज्युनियर केजीच्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून या शाळचे पनवेलकरांकडून स्वागत होत आहे. अजूनही प्रवेश घेण्यास इच्छुक नागरिकांनी महापालिका मुख्यालयाजवळील करमअली शाह उर्दु शाळा क्र. १० येथे संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

या शैक्षणिक वर्षामध्ये ज्युनियर के.जी. या वर्गाचा एक वर्ग आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आला असून सदर वर्गातील विद्यार्थ्यांची क्षमता ४० आहे. महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षण मोफत असणार आहे. पनवेल मनपा इंग्रजी शाळेच्या ३ किमीच्या परिसरातील विद्यार्थ्यांना सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे.

आत्तापर्यंत ४१ प्रवेश अर्ज वितरीत झाले असून त्यापैकी २३ प्रवेश अर्ज जमा करण्यात आले आहेत. महापालिका कार्यक्षेत्रातील इच्छुक नागरिकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी लवकरात लवकर प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रवेश अर्ज मोफत असून प्रवेश अर्ज भरत असताना बालकाचे जन्म प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच रहिवासी पुरावा म्हणुन आधार कार्ड, पालकांचे पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, विजबील, टेलिफोन बिल, पाणीपट्टी, वाहन चालविण्याचा परवाना, रेशनिंग कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडे करारनाम्याची प्रत यापैकी कोणतेही एक कागदपत्र पुरावा म्हणुन घेण्यात येईल. ज्युनियर के.जी.मध्ये प्रवेश घ्यावयाच्या बालकाचा जन्म दि. ०१/०७/२०१७ ते दि. ३१/१२/२०१८ यादरम्यान झालेला असावा.

या प्रवेश अर्जांची लॉटरी २३ जून २०२२ रोजी दुपारी ३ वाजता काढण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज तसेच अधिक माहितीसाठी अनिता दसवते (९९२०२१५६४७), प्राजक्ता महाडिक (९५९४०९१०५०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खुटारी येथे हरिनाम सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री शंकराचे देऊळ ट्रस्टच्या सौजन्याने खुटारी येथे श्री. संत वामनबाबा महाराज, श्री. संत सावळाराम बाबा महाराज, श्री. संत आप्पा माऊली यांच्या कृपाशीर्वादाने १९ ते २१ जूनपर्यंत श्री. चैतन्येश्वर शिवालय वर्धापन दिन व नाम चिंतन हरिनाम सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



श्री चैतन्येश्वर महादेव मंदिर येथे होणाऱ्या या सोहळ्यात रविवार दिनांक १९ जून रोजी सकाळी अभिषेक, त्यानंतर आरती, चैतन्येश्वर प्रासादिक भजन मंडळाचे भजन, श्री. पांडुरंग प्रासादिक भजन मंडळ खारघरचे भजन, ह.भ. प. संजय महाराज मढवी यांचे प्रवचन, ह.भ. प. गणेश महाराज पुलकुंठ्वार यांचे किर्तन आणि त्यानंतर महाप्रसाद, सोमवारी (दि. २०) आरती त्यानंतर ओम नर्मदेश्वर प्रासादिक भजन मंडळाचे भजन, राधा कृष्ण प्रासादिक भजन मंडळाचे भजन, ह.भ. प. रघुनाथ महाराज पाटील यांचे प्रवचन त्यानंतर सामुदायिक हरिपाठ, ह.भ. प. महेश महाराज साळुंखे यांचे किर्तन त्यानंतर महाप्रसाद तर मंगळवार दिनांक २१ जून रोजी सकाळी १० वाजता ह.भ. प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी देवाची) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

या सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविक भक्त, रायगड, ठाणे परिसर, श्री सदगुरु वामनबाबा पायी दिंडी सोहळा रायगड ठाणे परिसर यांची किर्तनसाथ लाभणार आहे. या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापक म्हणून श्री. चैतन्येश्वर ग्रामस्थ मंडळ, एकटपाडा श्री गावदेवी क्रिकेट संघ यांनी केले आहे.

# भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्याकडून मोदी सरकारचे अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

मोदी सरकारने मंजुरी दिलेल्या अग्निपथ योजनेमुळे तरुणांना लष्करात काम करण्याची संधी मिळणार आहे. या योजनेला मंजुरी दिल्याबद्दल प्रदेश युवा मोर्चाचे अध्यक्ष विक्रांत पाटील यांनी मोदी सरकारचे अभिनंदन केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात विक्रांत पाटील यांनी म्हटले आहे की, सशस्त्र दलात इतर कोणत्याही विद्यमान रँकपेक्षा वेगळी अशी त्यांची रँक असेल. चार वर्षांची सेवा पूर्ण केल्यावर, संघटनात्मक आवश्यकता आणि सशस्त्र दलांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणांच्या आधारे, अग्निवीरांना सशस्त्र दलात कायमस्वरूपी नावनोंदणीसाठी अर्ज करण्याची संधी दिली जाईल. या अर्जांचा त्यांच्या चार वर्षांच्या व्यस्त कालावधीतील कामगिरीसह वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित केंद्रीकृत पद्धतीने विचार केला जाईल आणि अग्निवीरांच्या प्रत्येक विशिष्ट तुकडीच्या २५ टक्क्यांपर्यंत सशस्त्र दलाच्या नियमित केडरमध्ये नोंदणी केली जाईल. सशस्त्र दलांना अधिक सक्षम करण्यासाठी अग्निपथ योजनेची रचना करण्यात आली आहे. सैनिकांचा गणवेश परिधान करण्यास उत्सुक असलेल्या तरुणांना या योजनेद्वारे देशसेवेची संधी मिळेल.

चार वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यावर, अग्निवीरांना एकवेळचे 'सेवानिधी' पॅकेज दिले जाईल. 'सेवानिधी'ला प्राप्तिकरातून सूट मिळेल. अग्निवीरांना भारतीय सशस्त्र दलातील त्यांच्या व्यस्त कालावधीसाठी ४८ लाख रुपयांचे विना-सहयोगी जीवन विमा संरक्षण प्रदान केले जाईल, असेही विक्रांत पाटील यांनी पत्रकात नमूद केले आहे. अधिक माहितीसाठी https://www.mygov.in/campaigns/agniveer/ या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन केले आहे.

**महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जून ९–१५, २०२२/ज्येष्ठ १९–२५, शके १९४४**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, यांजकडून**

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये.**

क्रमांक भूसंपादन/कात–२/शहापूर/एस.आर. ८५/२०२१.– ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/ अ २, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) मौजे धेरंड, ता. अलिबाग येथील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरीता जोडरस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत;)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे. तसेच **शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ, दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्र. ९१) अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क द्वारे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत लोक हितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन च्या आणि प्रकरण तीन च्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आलेली आहे. (सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतुपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम(५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप–नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्र. साशा/भूसं–६/मौजे धेरंड/२०२१, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**
**जमिनीचे वर्णन**
गावाचे नाव शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड

| अ.क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ७६/१ | |
| २ | ७६/२/अ/१ | |
| ३ | ७६/२/अ/२ | |
| ४ | ७६/२ब/१ | |
| ५ | ७६/२ब/२ | ०–३०–९० |
| ६ | ७६/२ब/३ | |
| ७ | ७६/३ | |
| | **एकूण क्षेत्र** | **०–३०–९०** |

**अनुसूची–दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव.–** अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरीता जोडरस्ता.

**प्रकल्पकार्याचे वर्णन.–** पेझारी शहापूर धेरंड माणकुले रस्ता, रस्ते विकास योजना सन २००१–२१ मध्ये समाविष्ट असून, राज्यमार्ग दर्जाचा आहे. या योजनेतील रस्त्याचा दर्जा राज्यमार्ग क्र. ९० असा असून त्याची एकूण लांबी ६.०० कि.मी. इतकी आहे. अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड गावादरम्यान पुलाचे पोहोचमार्गाचे बांधकाम जागेअभावी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुलाच्या पोहोच रस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ.–** रेवस, माणकुले व परिसरातील ग्रामस्थांना पेझारीकडे जाण्यासाठी कार्लेखिंडीमार्ग जाणेसाठी १३ कि.मी. इतके अंतर पार करून जावे लागते. जर पुलासाठी पोहोच रस्त्याचे बांधकाम झाल्यास हे अंतर ६ कि.मी. इतके कमी होईल. सध्या मांडवा जेट्टी वरून मुंबईला जाणे सोयीस्कर झाल्याने शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरीकांना रेवस मार्गे जाणेसाठी कार्लेखिंडीतून २० कि.मी. इतके अंतर जावे लागते. पण पुलासाठी पोहोच रस्त्याचे काम झाल्यास हे अंतर १० किमी इतके कमी होऊ शकते. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा व पायाभूत सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे.

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे **निरंक**

**अनुसूची–चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.–** अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे. तसेच सदरच्या जोडरस्त्यामुळे शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरिकांचे प्रवासाचे अंतर कमी होऊन त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्र. ९१) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासातून प्रस्तूत प्रकल्पास सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची–पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील **निरंक**

**टिप.–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग, अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अलिबाग,**
**दिनांक २६ मे २०२२.**

**सही/–**
**प्रशांत ढगे,**
**उप विभागीय अधिकारी अलिबाग,**
**उप विभाग अलिबाग.**

**उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग, अलिबाग यांजकडून**

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये.**

क्रमांक भूसंपादन/कात–२/धेरंड/एस.आर.८४/२०२१.– ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे.) मौजे धेरंड, ता. अलिबाग येथील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरिता जोडरस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची–दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची–तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची–चार मध्ये दिलेला आहे. तसेच **शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ, दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्रमांक ९१) अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क द्वारे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण–दोन च्या आणि प्रकरण–तीन च्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आलेली आहे ; (सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण–चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतुपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम(५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्रमांक साशा/भूसं–६/मौजे धेरंड/२०२१, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**
**जमिनीचे वर्णन**
गावाचे नाव मौजे धेरंड, ता. अलिबाग, जि. रायगड

| अ. क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | २/१ | |
| २ | २/२ | |
| ३ | २/३/अ | ०–२३–५० |
| ४ | २/३/ब | |
| ५ | २/४ | |
| ६ | ४/१ | |
| ७ | ४/२ | |
| ८ | ४/३ | |
| ९ | ४/४ | ०–४१–२५ |
| १० | ४/५/अ | |
| ११ | ४/५/ब | |
| १२ | ४/६ | |
| १३ | ५/१ | |
| १४ | ५/२ | |
| १५ | ५/३/अ/१ | ०–५३–६० |
| १६ | ५/३/अ/२ | |
| १७ | ५/३/ब | |
| १८ | १५/१ | |
| १९ | १५/२ | ०–४५–४० |
| २० | १५/३ | |
| २१ | १५/४ | |
| २२ | १६/१ | |
| २३ | १६/२ | ०–३७–६० |
| २४ | १६/३ | |
| २५ | १८/१ | |
| २६ | १८/२ | ०–०९–४० |
| २७ | १८/३/अ | |
| २८ | १८/३/ब | |
| २९ | १९/१ | |
| ३० | १९/२ | ०–२२–५० |
| ३१ | १९/३ | |
| ३२ | १९/४ | |
| | **एकूण क्षेत्र** | **२–३३–००** |

**अनुसूची–दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव.–** अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरीता जोडरस्ता.

**प्रकल्पकार्याचे वर्णन.–** पेझारी शहापूर धेरंड माणकुले रस्ता, रस्ते विकास योजना सन २००१–२१ मध्ये समाविष्ट असून, राज्यमार्ग दर्जाचा आहे. या योजनेतील रस्त्याचा दर्जा राज्यमार्ग क्रमांक ९० असा असून त्याची एकूण लांबी ६.०० कि.मी. इतकी आहे. अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड गावादरम्यान पुलाचे पोहोचमार्गाचे बांधकाम जागेअभावी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुलाच्या पोहोच रस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ.–** रेवस, माणकुले व परिसरातील ग्रामस्थांना पेझारीकडे जाण्यासाठी कार्लेखिंडीमार्ग जाणेसाठी १३ कि.मी. इतके अंतर पार करून जावे लागते. जर पुलासाठी पोहोच रस्त्याचे बांधकाम झाल्यास हे अंतर ६ किं.मी. इतके कमी होईल. सध्या मांडवा जेट्टी वरून मुंबईला जाणे सोयीस्कर झाल्याने शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरीकांना रेवस मार्गे जाणेसाठी कार्लेखिंडीतून २० कि.मी. इतके अंतर जावे लागते. पण पुलासाठी पोहोच रस्त्याचे काम झाल्यास हे अंतर १० किमी इतके कमी होऊ शकते. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा व पायाभूत सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे.

**अनुसूची–तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे निरंक**

**अनुसूची–चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.–** अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे. तसेच सदरच्या जोडरस्त्यामुळे शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरिकांचे प्रवासाचे अंतर कमी होवून त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ, दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्रमांक ९१) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासातून प्रस्तुत प्रकल्पास सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची–पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल निरंक**

**टिप.–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अलिबाग,**
**दिनांक २६ मे २०२२.**

**सही/–**
**प्रशांत ढगे,**
**उप विभागीय अधिकारी अलिबाग,**
**उप विभाग अलिबाग.**

पान नं. ७ वर...

# प्रभागनिहाय मतदार याद्या आज होणार प्रसिद्ध

## नवी मुंबई मनपा निवडणुकीसाठीची प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका निवडणुकीसाठीची प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून शुक्रवारी (दि. १७) यातील महत्त्वाचा भाग असलेली प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रभाग बदल व आरक्षणामुळे इच्छुकांची गणिते बिघडल्याने मतपेरणीसाठी या याद्यांची प्रतीक्षा आहे.

न्यायालयाने ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर निवडणूकपूर्व कामांना वेग घेतला आहे. या वर्षी राज्य शासनाने बहुसदस्यीय प्रभाग पद्धती लागू केल्याने पालिका प्रशासनाला सर्वच प्रक्रिया नव्याने राबवावी लागत आहे. त्यानुसार प्रभाग रचना अंतिम केल्यानंतर आरक्षण सोडत



काढण्यात आली. त्यानंतर निवडणूक आयोगानेही निवडणुकीसाठीच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम निश्चित केला होता. त्यानुसार १७ जून रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

सुरुवातीला ५ जानेवारीपर्यंतची मतदार यादी निश्चित करण्यात आली होती. परंतु आता ३१ मे २०२२ पर्यंतची अद्ययावत केलेली मतदार यादी निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे मतदारांत वाढही होणार असल्याने प्रारूप मतदार याद्यांकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. नवी मुंबई शहरात बेलापूर या दोन्ही मतदारसंघातील मतदारांच्या प्रभागनिहाय प्रारूप याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. निवडणूक आयोगाकडून ५ जानेवारी २०२२ रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली होती. त्या वेळी नवी मुंबईत आठ लाख ९४ हजारांपेक्षा अधिक मतदारांची नोंद होती. आता निवडणूक आयोगाने ३१ मे २०२२ पर्यंतची अद्ययावत केलेली यादी अंतिम करण्यात येणार आहे.

१७ जूनला प्रारूप मतदार यादी जाहीर केली जाणार असून त्यानंतर हरकती, सूचना व त्यानंतर पालिका निवडणुकीसाठी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी नवी मुंबईत १११ प्रभाग होते. परंतु या वेळी बहुसदस्यीय निवडणुकीत ४१ प्रभाग असणार आहेत. त्यामुळे पालिका निवडणूक विभागाला अतिशय काटेकोरपणे प्रभागनिहाय मतदार याद्या तयार कराव्या लागणार आहेत.

### हेराफेरी झाल्यास आंदोलन

**नवी मुंबई महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. या कामात जर हेराफेरी झाली तर त्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नवी मुंबई भाजपच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबतचे लेखी निवेदन आमदार गणेश नाईक यांनी १४ जून रोजी राज्याचे निवडणूक आयुक्त, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी तसेच सर्व प्रभाग अधिकारी यांना दिले आहे.**

**निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या बनवल्या जात आहेत. याबाबतचे काम अंतिम टप्प्यात असून निश्चित केल्याप्रमाणे १७ जूनला त्या प्रसिद्ध करण्यात येतील.**

**-अभिजित बांगर, आयुक्त**

# रेल्वे स्टेशन परिसरातील मोबाइल चोरटे ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकातून मोबाईल चोरी करणाऱ्या एका चोरट्यास रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याने त्याच्या कडून अनेक मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पनवेल रेल्वे स्थानकात चोरट्यांचा सुळसुळाट झाला असून एकाच रात्रीत मोबाईल चोरीच्या तीन घटना घडल्या आहेत. रात्रीच्या वेळी प्रवासादरम्यान स्थानकात थांबलेल्या प्रवाशांसोबत हे प्रकार घडले आहेत. पनवेल रेल्वेस्थानकाच्या सुरक्षा भिंत नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती सहज फलाटावर प्रवेश करू शकतात याच संधीचा फायदा मोबाइल चोरट्यांकडून घेतला जात असल्याचे दिसून येत आहे. लांबपल्याच्या तसेच लोकल गाड्या या स्थानकातून सुटतात त्यामुळे एखाद्या लांबपल्याच्या रेल्वेने पनवेल येथे आलेले प्रवासी स्थानकातच रात्र घालवतात. अशावेळी ते फलाटावर किंवा प्रतिक्षा कक्षात झोपले असतात. त्यावेळी त्यांच्या मोबाइलला व पाकिटावर डोळा ठेवून असलेल्या व्यक्ती संधी साधत आहेत. अशाच प्रकारे तिघाजणांचे मोबाईल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. त्या अनुषंगाने पनवेल रेल्वे पोलिसांनी हर्षल हळदणकर याला ताब्यात घेतले आहे त्यामुळे अनेक मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# आयटीआय प्रवेश अर्जासंदर्भात आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार आणि आपल्या पसंतीक्रमांकनुसार प्रत्येक उमेदवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असतात. आयटीआय प्रवेश प्रक्रिया ही दहावी निकाल लागल्यावरच सुरू होते. दहावी झालेले विद्यार्थी लिंक ओपन असल्यास अर्ज करू शकतात. ह्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून त्या त्या वेळी सूचना वेबसाईटवर स्पष्ट दिलेल्या असतात.


आयटीआय प्रवेश अर्ज करण्याची मुदत ठरलेली असते आणि त्या मुदतीतच अर्ज करणे आवश्यक असते ह्याचेही भान ठेवणे खूप गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही नजीकच्या शासकीय आयटीआयला भेट दिल्यास सर्व आवश्यक माहिती मिळू शकते. अर्ज भरण्याची प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने असते, ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची पद्धत पूर्णतः बंद झालेली आहे.

जातीचा दाखला, नॉन क्रिमिलयेर दाख, इंटरमेडिएट ड्रॉविंग परीक्षा उत्तीर्ण असेल तर त्याचे सर्टिफिकेट, स्काऊट गाईड पूर्ण केले असल्यास त्याचे सर्टिफिकेट, जिल्हा, राज्य राष्ट्रीय पातळीवर खेळात भाग घेऊन प्राविण्य मिळविल्यास त्याचे संबंधित अधिकारी ह्यांच्याकडून प्राप्त सर्टिफिकेट जोडल्यास काही विशेष गुण मिळतात. त्यामुळे वरील सर्व दाखले प्रत्यक्षात असणे आवश्यक आहेत.

दरम्यान, आयटीआयमध्ये गुणवतेनुसार नंबर लागल्यास शाळा सोडल्याचा दाखला खरच हरविला असल्यास योग्य ती सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष प्रवेशावेळी सादर करणे बंधनकारक असणार आहे. तरी वरील सर्व मुद्द्याची स्वतः पालक आणि पाल्याने अर्ज भरतानाच काळजी घेणे आवश्यक आहे.

सर्वांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज काळजीपूर्वक भरावा तसेच सर्व प्रवेश प्रक्रियेपूर्वीच सर्व आवश्यक दाखले काढून ठेवणे गरजेचे आहे. इतर ठिकाणच्या सुद्धा प्रवेश प्रक्रियेसाठी बहुतांश हीच पद्धत अवलंबली जात असते. सर्व माहिती admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी पनवेल आयटीआयचे गणित निदेशक तुषार रामदास कर्पे (७९७७१०५२३५) यांच्याशी साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जेएनपीएत २१ टन मालाने भरलेला संशयित कंटेनर कस्टमच्या ताब्यात



**उरण : प्रतिनिधी**

अरबी समुद्रातून जेएनपीएच्या चॅनेलमध्ये वाहून आलेल्या एका २१ टन मालाचा ४० फुटी संशयित कंटेनर अधिकाऱ्यांनी समुद्राच्या पाण्याबाहेर काढून कस्टम विभागाच्या ताब्यात दिला आहे.

जेएनपीएच्या चॅनेलमध्ये अरबी समुद्रातुन एक कंटेनर सायंकाळी वाहात आला होता. समुद्रात आलेल्या या संशयित कंटेनर प्रवाहाबरोबर इकडून तिकडे वाहात जात-येत होता. यामुळे जेएनपीएच्या बंदरात ये-जा करणाऱ्या मालवाहू जहाजानाही वाहते कंटेनर अडथळा निर्माण करीत होता.

यामुळे एखादा अपघात घडण्याची शक्यताही निर्माण झाली होती. ही बाब जेएनपीएच्या ट्रॉफिक आणि पायलट विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी पायलट बोट आणि टगच्या साहाय्याने वाहते कंटेनर बंदरात आणून क्रेनने समुद्रात बाहेर काढले. ४० फुटीच्या कंटेनर मध्ये २१ टन माल आहे. जेएनपीएच्या अधिकाऱ्यांनी हे समुद्रातुन आलेले संशयित कंटेनर कस्टम विभागाच्या ताब्यात दिले असल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली आहे.



**पनवेल : पावसाने गुरुवारी सकाळी दमदार हजेरी लावली. त्यामुळे कामावर जाणाऱ्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

### विद्यार्थ्यांचे स्वागत



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या सुकापूरमधील शाळेत बुधवारी नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त जि. प. सदस्य अमित जाधव यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी श्री. मोहिते, भाजप सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील व शाळेतील शिक्षक उपस्थित होते.**

# नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त गव्हाण विद्यालयात पुस्तकांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेज मध्ये नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यालयाच्या शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ग्रंथपाल महेश म्हात्रे, उपशिक्षक सागर रंधवे, सेवक डी. आर. ठाकूर व अरुण कोळी आणि पालक उपस्थित होते.

शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालय विभागाच्या वतीने नवीन पुस्तकांचे संच मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

# पारगावमधील अ. पां. भोईर विद्यालयात वटवृक्षाचे पूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय परंपरेतील सत्यवान-सावित्रीची महती सांगणारी वटपौर्णिमा तसेच वडाच्या झाडापासून मिळणारा प्राणवायू शरीराला नवसंजीवनी देण्याचे काम करतो. अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनियर कॉलेज दापोली पारगावमधील सर्व महिला शिक्षिकांनी वटवृक्षाचे पूजन केले.

या वेळी कॉलेजच्या प्राचार्या पुष्पलता ठाकूर यांनी सर्व महिलांना वाण म्हणून प्रत्येकी एक रोप देवून पर्यावरण समतोल साधण्याचा प्रयत्न केला. या वेळी दापोली-पारगावमधील काही महिला उपस्थित होत्या, अशी माहिती जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख कटके यांनी दिली.



# होपमिररचा वर्धापनदिन आजी-आजोबांसोबत साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशन संस्था ही विविध उपक्रम हाती घेत असून, गरीबांना मदतीचा हात असते. या होप मिरर फाउंडेशन संस्थेचा द्वितीय वर्धापनदिन पनवेल येथील पेंधर परमशांतीधाम वृद्धाश्रमातील आजी, आजोबांना फळे वाटप करून सामाजिक बांधिलकीतून साजरा करण्यात आला.

या वेळी होपमिरर फाउंडेशन संस्थेच्या नावाने परमशांतीधाम वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष आबानंद महाराज, होप मिरर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमजान शेख यांच्या समवेत आजी-आजोबांसोबत केक कापण्यात आला. होप मिरर फाउंडेशन संस्थेच्या वतीने ४३ वृद्धांना फळे वाटप करण्यात आली.

होपमिरर फाउंडेशन संस्था विविध ठिकाणी पोहचत असून उत्तम सामाजिक काम करत आहेत आणि यापुढे त्यांनी असेच काम करत रहावे असे या वेळी परमशांतीधाम वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष आबानंद महाराज यांनी सांगितले.



होपमिरर फाउंडेशन संस्थेला दोन वर्ष पूर्ण होत असून तिसऱ्या वर्षात पदार्पण करीत आहेत आणि म्हणूनच आजी, आजोबांचे आशीर्वाद घेण्यासाठी आम्ही होप मिरर फाउंडेशन संस्थेच्या वतीने फले वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे, असे होपमिरर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमजान शेख यांनी बोलतांना सांगितले.

या वेळी होप मिरर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमजान शेख, परमशांतीधाम वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष आबानंद महाराज, वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक अभय वाघ, रवी चौगुले, कवी मिलिंद जाधव, रुबिना खान, आशिष कदम, तुषार पोरजी उपस्थित होते.

# 'जोडीदाराची विवेकी निवड' मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर के. सी कॉलेज, चर्चगेट मुंबई येथे मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे ऑनलाइन आयोजन करण्यात आलेले होते. हा कार्यक्रम हिंदी व इंग्रजी भाषेतून झाला. या कार्यक्रमास कॉलेजच्या प्राचार्य सिन्हा मॅडम, समन्वयक प्रोफेसर पाखरे सर व इतर प्रोफेर्सस आणि विद्यार्थी मिळून एकुण ५२उपस्थिती होती. आर्ट्स कॉमर्स व सायन्सचे द्वितीय वर्षाचे विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

पीपीटीच्या माध्यमातून अतिशय सहज सुलभ आणि सोप्या भाषेमधून हा विषय विद्य्यार्थ्यांना समजावून देण्यात आला. या विषयातील विविध कंगोरे, जबाबदाऱ्या, आपल्या पार्टनर कडे बघण्याचा दृष्टिकोन, विवाहाच्या पद्धती, व महाराष्ट्र अंनिस तर्फे सत्यशोधक विवाह पद्धतीने करण्यात आलेले काम व त्याचे स्वरुप आणि त्यातील फायदे या सगळ्या गोष्टींच्या अंगाने चर्चा घडवून आणली. मार्गदर्शन सुशिला मुंडे यांनी केले.

# 'दिशा'च्या सख्यांकडून अनोखी वटपौर्णिमा

**पनवेल : प्रतिनिधी**

दिशा महिला मंचच्या सख्यांनी विधवा महिलेच्या हस्ते महानगरपालिकेच्या कामोठे येथील आरोग्य विभागात वट वृक्ष लावून त्याची आरोग्य विभागातील कर्मचारी व दिशा व्यासपीठातील सख्यांकडून या वृक्षाची पूजा करून अनोख्या पद्धतीने वटपौर्णीमा साजरी केली.

दिशा व्यासपीठामार्फत 'ती' च्या साठी हळदी कुंकू, मान - सन्मान सुरुवात तर झाली होती परंतु अजूनही अशा अनेक प्रथा आहेत ज्यात तीला सहभागी होता येत नाही. इतर सख्याप्रमाणे तिलाही हा सावित्री उत्सवात सहभागी होता यावं म्हणून जास्त काही नाही पण तिच्या हातून ते झाड लावून तो सन्मान तर तिला नक्कीच देऊ शकतो या उद्देशाने या वर्षी वटपौर्णिमा साजरी केली असे निलम आंधळे यांनी सांगितले

या वेळी कामोठे पोलीस वरिष्ठ अधिकारी स्मिता जाधव, कामोठे मेडिकल ऑफिसर डॉ. कीर्ती हम्पे, जीवनवीद्या मिशन च्या मिना नांदोस्कर, 'ती' म्हणजे वंदना पोपळकर व प्रियंका पाटील संस्थापक निलम आंधळे, उपाध्यक्ष विद्या मोहिते सचिव खुशी सावर्डेकर सदस्य रेखा ठाकूर, शिल्पा चौधरी, श्रुती शिंदे, अपर्णा गावडे व आरोग्य विभागाच्या महिला कर्मचारी उपस्थित होत्या.



# चांभारखिंड ग्रामपंचायतीवर फडकला भाजपचा झेंडा

## ▮ सरपंचपदी मंगेश पालकर यांची बिनविरोध निवड

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यात महत्त्वाची समजल्या जाणाऱ्या चांभारखिंड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपचे मंगेश पालकर यांची बिनविरोध निवड झाली. भाजपच्या वरिष्ठांनी पालकर यांचे अभिनंदन केले.

धोंडू पालकर यांनी राजीनामा दिल्यामुळे चांभारखिंड ग्रामपंचायतीचे सरपंचपद रिक्त झाले होते. दरम्यान, राज्य सरकारने थेट सरपंच निवडीचा निर्णय बदलल्याने पुन्हा एकदा सदस्यामधून सरपंच निवडीचा कार्यक्रम जाहीर झाला.

नऊ सदस्य असलेल्या या ग्रामपंचायतीचे सदस्य रामदास पारावे यांनी राजीनामा दिल्यामुळे प्रथम या रिक्त सदस्यपदासाठी निवडणूक घेण्यात आली. या वेळी भाजपचे मंगेश पालकर यांची सदस्य म्हणून बिनविरोध झाली. १३ जून रोजी झालेल्या निवडणुकीत मंगेश पालकर यांची सरपंच म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.


(छाया : महेश शिंदे)

चांभारखिंड ग्रामपंचायतीत भाजपचा सरपंच निवडून आणण्यात पक्षाचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर व तालुकाध्यक्ष जयवंत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे विभाग अध्यक्ष सुहास कुडपाने यांनी विशेष मेहनत घेतली.

दरम्यान, पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंगेश पालकर व सुहास कुडपाने यांचे विशेष अभिनंदन व सत्कार केला.

# हाळ आदिवासीवाडीत पाणीटंचाई

▮ ना टँकर पोहचत, ना पाणीयोजना कार्यान्वित

▮ तीन महिन्यांपासून जीव धोक्यात घालून आणावे लागते पाणी

**खालापूर : अरुण नलावडे**

तालुक्यातील हाळ आदिवासीवाडीतील महिलांना गेल्या तीन महिन्यांपासून मुंबई-पुणे महामार्ग ओलांडून एक किलोमीटर अंतरावरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. महामार्गावरील वाहनांच्या धडकेची पर्वा न करता या वाडीतील आदिवासी महिलांना डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागते.


(छाया : अरुण नलावडे)

**हाळ गावात खालापूर पंचायत समिती टँकरने पाणी पुरवठा करते मात्र हाळ आदिवासीवाडीचा रस्ता अरुंद असल्याने तेथे मोठा टँकर जात नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे लहान टँकरची मागणी केली आहे. मात्र तो अद्याप आला नसल्याने हाळ आदिवासीवाडीला पाणीपुरवठा करता येत नाही.**
**–माधव शिंदे, प्रभारी गटविकास अधिकारी, खालापूर**

रायगड जिल्ह्यात कातकरी उत्थान अभियानांतर्गत आदिवासींसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. मात्र तालुक्याचे मुख्यालय असलेल्या खालापूरपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या हाळ आदिवासीवाडीतील महिलांना महामार्ग ओलांडून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे.

हाळ गावात राष्ट्रीय स्वजलधारा योजनेंतर्गत एक कोटी १० लाख खर्चाची व जलजीवन योजनेंतर्गत ४५ लाख खर्चाची पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र या योजनांतील इंधन विहिरींना पाणी नसल्याचे सांगत खालापूर पंचायत समिती टँकरने पाणीपुरवठा करत आहे. मात्र हाळ आदिवासीवाडीतील महिलांना मुंबई-पुणे महामार्ग ओलांडून खासगी मालकाच्या मेहरबानीखाली दबून विहिरीचे पाणी आणावे लागत आहे.

पाणी योजनांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी वापरून ग्रामस्थांना पाणी मिळत नसेल तर या योजनांचे पैसे गेले कुठे? ग्रामपंचायत योजनांचे काय झाले? असे प्रश्न उपस्थित करून हाळ ग्रामस्थ शफीक मांडलेकर यांनी, लोकांना पाणी मिळत नसेल तर या पाणी योजनांची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली आहे.

याबाबत हाळ ग्रामसेविका स्वप्नाली पोळ यांना विचारणा केली असता, हाळ गावात पाणी आहे, असे उत्तर त्यांनी दिले. हाळ आदिवासीवाडीतील ग्रामस्थ हौस म्हणून जीव धोक्यात घालून पिण्यासाठी पाणी आणतात का? अशी विचारणा केली असता, 'मी घरी आहे', असे सांगून त्यांनी उत्तर देणे टाळले. दरम्यान, ग्रामसेविका स्वप्नाली पोळ रजा न घेता घरीच राहिल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याचे खालापूरचे प्रभारी गटविकास अधिकारी माधव शिंदे यांनी सांगितले.

पान नं. ५ वरून

**उप विभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग, यांजकडून**

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये.**

क्रमांक भूसंपादन/कात–२/नारंगीखार/एस.आर.८६/२०२१.– ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३(२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/ अ २, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल; आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) मौजे धेरंड, ता. अलिबाग येथील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरीता जोडरस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त '' सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे. तसेच **शासन राजपत्र** असाधारण भाग चार–अ, दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्र. ९१) अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क द्वारे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत लोक हितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन च्या आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आलेली आहे. (सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे हेतुपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्र. साशा/भूसं–६/मौजे धेरंड/२०२१, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ अन्वये उप विभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**

**जमिनीचे वर्णन**

गावाचे नाव मौजे नारंगीखार, ता. अलिबाग, जि. रायगड

| अ. क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | आवश्यक जमिनीचे आदमासे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ४८ | ०.०५.८० |
| २ | ४९/१ | |
| ३ | ४९/२ | ०.२४.४० |
| ४ | ४९/३ | |
| ५ | ५९/१/अ | |
| ६ | ५९/१/ब | |
| ७ | ५९/२ | |
| ८ | ५९/३ | ०.७२.४० |
| ९ | ५९/४/अ | |
| १० | ५९/४/ब | |
| ११ | ६१/१/अ | |
| १२ | ६१/१/ब | |
| १३ | ६१/२ | |
| १४ | ६१/३/अ | ०.००.५० |
| १५ | ६१/३/ब | |
| १६ | ६१/४ | |
| १७ | ६२ | ०.२८.३० |
| १८ | ६४ | ०.०१.९० |
| १९ | ६५/१/अ | |
| २० | ६५/१/ब | ०.१३.६० |
| २१ | ६५/२ | |
| २२ | ६६/१ | |
| २३ | ६६/२ | ०.३४.०० |
| २४ | २२६/१ | |
| २५ | २२६/२ | ०.०९.५० |
| २६ | २६६/३ | |
| २७ | २३१ | ०.०७.७० |
| २८ | २३२/१ | |
| २९ | २३२/२ | ०.००.५० |
| ३० | २३२/३ | |
| ३१ | २३३ | ०.१३.२० |
| ३२ | २३४ | ०.१९.९० |
| ३३ | २३५ | ०.१५.४० |
| ३४ | २५०/१ | |
| ३५ | २५०/२ | ०.३३.७० |
| ३६ | २५१ | ०.००.५० |
| ३७ | २५७ | ०.०२.२५ |
| ३८ | २५८ | ०.२५.८० |
| ३९ | २६० | ०.१८.५० |
| ४० | २८५ | ०.१३.४५ |
| ४१ | २८६/१ | |
| ४२ | २८६/२ | ०.२५.९० |
| | **एकूण क्षेत्र** | **३.६७.४५** |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव.–** अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले–धेरंड दरम्यान मोठ्या पुलाकरिता जोडरस्ता..

**प्रकल्पकार्याचे वर्णन.–** पेझारी शहापूर धेरैड माणकुले रस्ता, रस्ते विकास योजना सन २००१–२१ मध्ये समाविष्ट असून, राज्यमार्ग दर्जाचा आहे. या योजनेतील रस्त्याचा दर्जा राज्यमार्ग क्र. ९० असा असून त्याची एकूण लांबी ६.०० कि.मी. इतकी आहे. अलिबाग तालुक्यातील खारनई खाडीवर माणकुले– धेरंड गावादरम्यान पुलाचे पोहोचमार्गाचे बांधकाम जागेअभावी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुलाच्या पोहोच रस्त्यासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**समाजाला मिळणारे लाभ.–** रेवस, माणकुले व परिसरातील ग्रामस्थांना पेझारीकडे जाण्यासाठी कार्लेखिंडीमार्ग जाणेसाठी १३ कि.मी. इतके अंतर पार करून जावे लागते. जर पुलासाठी पोहोच रस्त्याचे बांधकाम झाल्यास हे अंतर ६ किं.मी. इतके कमी होईल. सध्या मांडवा जेट्टी वरून मुंबईला जाणे सोयीस्कर झाल्याने शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरिकांना रेवस मार्गे जाणेसाठी कार्लेखिंडीतून २० कि.मी. इतके अंतर जावे लागते. पण पुलासाठी पोहोच रस्त्याचे काम झाल्यास हे अंतर १० किमी इतके कमी होऊ शकते. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा व पायाभूत सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे.

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे **निरंक**

**अनुसूची–चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.– अलिबाग तालुक्यातील एका टोकावर असलेल्या लोकांसाठी शैक्षणिक, वैद्यकीय सुविधा प्राप्त करणे सहज सुलभ होणार आहे. तसेच सदरच्या जोडरस्त्यामुळे शहापूर, मोठे शहापूर, पेझारी, पोयनाड व त्या परिसरातील नागरिकांचे प्रवासाचे अंतर कमी होऊन त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–अ, दिनांक १७ मे २०२२ (असाधारण क्र. ९१) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासातून प्रस्तुत प्रकल्पास सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची–पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील **निरंक**

**टिप.–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**अलिबाग,**
**दिनांक २३ मे २०२२.**

**सही/–**
**प्रशांत ढगे,**
**उप विभागीय अधिकारी अलिबाग,**
**उप विभाग अलिबाग.**

**क्र.जिमाका/राअ/जाहि./५४/२०२२–२३**

# आयर्लंडविरुद्ध मालिकेसाठी हार्दिक पांड्याकडे नेतृत्व

## राहुल त्रिपाठीला संधी, सॅमसनचे पुनरागमन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) विजेता कर्णधार हार्दिक पांड्याकडे आयर्लंडविरुद्ध होणाऱ्या दोन सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. महाराष्ट्राचा फलंदाज राहुल त्रिपाठीला प्रथमच संधी मिळाली आहे, तर यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनचे पुनरागमन झाले आहे.

ड्युब्लिन येथे २६ आणि २८ जूनला होणाऱ्या आयर्लंडविरुद्ध दोन ट्वेन्टी-२० सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. यंदाच्या आयपीएल हंगामात हार्दिक पांड्याने गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व केले होते. आपल्या नेतृत्वात त्याने संघाच्या पदार्पणातच जेतेपद पटकावले तसेच या स्पर्धेत त्याने गोलंदाजी आणि फलंदाजी अशा दोन्ही विभागांत दिमाखदार कामगिरी करून दाखली. याच कारणामुळे बीसीसीआयने त्याच्यावर आता भारतीय संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी टाकली आहे.

आयपीएलमध्ये सनरायजर्स हैदराबादकडून ४००हून अधिक धावा काढणारा त्रिपाठी हा एकमेव नवा चेहरा या संघात आहे. त्याचप्रमाणे राजस्थान रॉयल्सला अंतिम फेरीपर्यंत नेणारा कर्णधार सॅमसनलाही कारकीर्द सावरण्याची आणखी एक संधी मिळाली आहे. भुवनेश्वर कुमार हा संघाचा उपकर्णधार आहे.

ऋषभ पंत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेनंतर इंग्लंडविरुद्ध खेळण्यासाठी भारतीय कसोटी संघात सहभागी होणार आहे. त्यामुळे पांड्याकडे कर्णधारपद सोपविले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) जाहीर केलेल्या संघात फक्त दिनेश कार्तिकच्या नावापुढे यष्टीरक्षक असा उल्लेख केला आहे, परंतु इशान किशन आणि सॅमसन यांच्याकडेही यष्टीरक्षणाची क्षमता आहे.

### युवांना संधी, वरिष्ठांना विश्रांती!

बीसीसीआयने आयर्लंडविरोधातील टी-२० मालिकेसाठी हार्दिक पांड्यासोबत युवा खेळाडूंची फळी दिली आहे. या संघात त्याच्यासोबत इशान किशन, ऋतुराज गायकवाड, संजू सॅमसन, व्यंकटेश अय्यर, दीपक हुडा, युझवेंद्र चहल तसेच अक्षर पटेल आणि उमरान मलिक यांच्यासारखे तरुण खेळाडू असतील, तर रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासारखे वरिष्ठ खेळाडू या खेळाडूंना या मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.

**भारतीय संघ :**

हार्दिक पांड्या (कर्णधार), भुवनेश्वर कुमार (उपकर्णधार), इशान किशन, ऋतुराज गायकवाड, संजू सॅमसन, सूर्यकुमार यादव, वेंकटेश अय्यर, दीपक हुडा, राहुल त्रिपाठी, दिनेश कार्तिक (यष्टीरक्षक), यजुर्वेद्र चहल, अक्षर पटेल, रवी बिश्णोई, हर्षल पटेल, आवेश खान, अर्शदीप सिंग, उमरान मलिक.

## राष्ट्रीय प्रशिक्षक आरके शर्माच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वी एका अव्वल भारतीय महिला सायकलपटूने राष्ट्रीय प्रशिक्षक आरके शर्मा यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप लावले होते. त्यानंतर, भारतीय क्रीडा क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. आरके शर्मांच्या अचडणींमध्ये आता आणखी वाढ होताना दिसत आहे. आता एका महिला सायकलपटूनेदेखील शर्मांच्याविरोधात तक्रार केली आहे.

प्रशिक्षक शर्मांनी आपल्याला दोनदा तिला मारहाण केली होती. एवढेच नाही तर मी समलैंगिक असल्याचा आरोपही केला होता, असे या सायकलपटूने सांगितले आहे. सध्याची राष्ट्रीय चॅम्पियन आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेती डेबोरा हेरोल्डने हा आरोप केला आहे. डेबोराशिवाय आणखी दोन सायकलपटूंनीदेखील इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, त्यांनी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या अंतर्गत तक्रार समितीकडे आरके शर्मा आणि गौतमणी देवीविरोधांत तक्रार दाखल केली आहे.

## कुमारी विश्वचषक फुटबॉल स्पर्धा; अंतिम सामना नवी मुंबईत रंगणार




**मुंबई : प्रतिनिधी**

फिफा कुमारी (१७ वर्षांखालील) विश्वचषक फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर ३० ऑक्टोबरला रंगणार असून उपांत्य फेरीचे सामने गोव्याला होतील, अशी घोषणा फिफा आणि स्थानिक संयोजन समितीने (एलओसी) केली आहे.

भुवनेश्वरच्या किलगा स्टेडियममध्ये ११, १४ आणि १७ ऑक्टोबरला होणाऱ्या भारताच्या तिन्ही साखळी सामन्यांचे आयोजन केले जाईल. स्पर्धेची अधिकृत कार्यक्रमपत्रिका २४ जूनला जाहीर करण्यात येईल. साखळी फेरीतील २४ सामने १८ ऑक्टोबरला संपतील. हे सर्व सामने ओडिशा, गोवा आणि महाराष्ट्र यांना विभागून देण्यात आले आहेत.

नवी मुंबईचे पाटील स्टेडियम आणि फातोर्डाच्या पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे उपांत्यपूर्व फेरीचे सामने २१ व २२ ऑक्टोबरला होतील. त्यानंतर २६ ऑक्टोबरला उपांत्य फेरीचे सामने होणार आहेत. १६ संघांचा सहभाग असणाऱ्या या स्पर्धेत एकूण ३२ सामने होणार आहेत. यानंतर सातव्या हंगामातील विजेता ठरणार आहे.

## इंडोनेशिया बॅडमिंटन स्पर्धा प्रणॉयची लक्ष्यवर मात



**जकार्ता : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावरील लक्ष्य सेनचे इंडोनेशिया बॅडमिंटन स्पर्धेतील आव्हान बुधवारी (दि. १५) पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. भारतीय सहकारी एचएस प्रणॉयने त्याला नामोहरम केले.

पुरुष एकेरीच्या ३४ मिनिटे चाललेल्या सामन्यात लक्ष्यने प्रणॉयकडून १०-२१, ९-२१ असा पराभव पत्करला. यंदाच्या हंगामात २० वर्षीय लक्ष्यने सुपर ५०० दर्जाचे जेतेपद, प्रतिष्ठेच्या ऑल इंग्लंड स्पर्धेची अंतिम फेरी आणि थॉमस चषक स्पर्धेचे सांघिक विजेतेपद अशी सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. प्रणॉयने लक्ष्यविरुद्धच्या तिसऱ्या लढतीत प्रथमच विजय मिळवला आहे.

पुरुष दुहेरीत एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीने जपानच्या केलिचिरो मात्सुई आणि योशिनोरी ताकेउन्शी जोडीला नामोहरम केले. महिला दुहेरीत अश्विनी भट आणि शिखा गौतम जोडीने चीनच्या झँग शू शिआन आणि झेंग यू जोडीकडून २८ मिनिटांत हार पत्करली.

## दुखापतीमुळे राहुल इंग्लंडविरुद्ध मालिकेलाही मुकण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



अनुभवी सलामीवीर केएल राहुल पुढील महिन्यात बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या कसोटी सामन्याला मुकण्याची दाट शक्यता आहे. मांडीचा स्नायू दुखावल्यामुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतून माघार घ्यावी लागलेला राहुल अद्याप दुखापतीतून सावरला नसल्याची माहिती मिळत आहे.

ऋषभ पंत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेनंतर इंग्लंडविरुद्ध खेळण्यासाठी भारतीय कसोटी संघात दाखल होणार आहे. त्यामुळे आयर्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी अष्टपैलू हार्दिक पांड्याकडे कर्णधारपद सोपवले गेले आहे. इंग्लंडमध्ये भारतीय संघ एकमेव २०२१मधील प्रलंबित कसोटी सामना खेळणार आहे.

## नेशन्स फुटबॉल लीगमध्ये हंगेरीचा विजय

**वोल्व्हरहॅम्प्टन : वृत्तसंस्था**

नेशन्स लीग फुटबॉलमध्ये हंगेरीने इंग्लंडवर ४-० असा विजय मिळवत धक्कादायक निकालाची नोंद केली. हंगेरीकडून रोलान्ड सल्लाइने दोन गोल झळकावून विजयात मोलाचा वाटा उचलला. १९२८नंतर प्रथमच इंग्लंडच्या संघाने मायदेशात अशाप्रकारे मानहानीकारक पराभव पत्करला.



हंगेरीने यजमान इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात चांगली सुरुवात केली. रोलान्डने १६व्या मिनिटाला गोल झळकावत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर इंग्लंडने भक्कम बचाव करीत प्रतिस्पर्धी हंगेरीला गोल करण्याची संधी दिली नाही, मात्र यजमानांना गोल करण्यातही यश मिळाले नाही. त्यामुळे मध्यांतरापर्यंत सामन्यात हंगेरीकडे आघाडी होती.

दुसऱ्या सत्रात हंगेरीने आक्रमक खेळ करीत इंग्लंडवरील दडपण वाढवले. मग रोलान्डने (७०वे मि.) दुसरा गोल करू संघाच्या आघाडीत भर घातली. यानंतर इसोल्ट नागयने (८०वे मि.) अप्रतिम गोल करीत संघाला ३-० अशा सुस्थितीत पोहोचवले. मग इंग्लंडचा बचावपटू जॉन स्टोन्सला लाल कार्ड दाखवण्यात आले. उत्तरार्धात हंगेरीच्या डॅनिएल गाझदागने (८९वे मि.) गोलरक्षकाला चकवत गोल करीत संघाला ४-० असा विजय मिळवून दिला.

दुसरीकडे टिमो वेर्नरने (६८व्या मिनिटाला व ६९वे मि.) केलेल्या दोन गोलमुळे नेशन्स लीग फुटबॉलमध्ये जर्मनीने इटलीवर ५-२ असा दिमाखदार विजय साकारला. जर्मनीकडून जोशुआ किमिच (१०वे मि.), इकाय गुंडोगान (४५+४ मि.) आणि थॉमस म्युलर (५१वे मि.) यांनी संघाच्या विजयात योगदान दिले. पराभूत इटलीतर्फे विल्फ्रेड ग्रोंटो (७८वे मि.) व अलेसांद्रो बास्तोनी (९०+४ मि.) यांनी गोल झळकाविले.

## उरणमधील गोशीन रियू कराटेचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश



**उरण : बातमीदार**

पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियममध्ये १० ते १२ जूनदरम्यान राज्यस्तरीय कराटे अजिंक्यपद स्पर्धा झाल्या. त्यामध्ये उरणमधील गोशीन रियू कराटेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विविध वजनी गटामध्ये रोहित शरद घरत सिल्व्हर मेडल, शुभम परशुराम म्हात्रे ब्रॉन्झ मेडल, नेहा विशाल पाटील यांनी ब्रॉन्झ मेडल मिळविले. परेश पावसकर, समीक्षा पाटील, अभिज्ञा पाटील, श्लोक ठाकूर, वेदा ठाकरे आदी स्पर्धक यात सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये एकूण १,७१४ खेळाडू सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना सिहान राजू कोळी व गोपाळ म्हात्रे, रायगड जिल्हा प्रमुख मटीवानंद, राहुल तावडे रायगड जिल्हा सचिव अतुल पोतदार, अतुल बोरा रायगड जिल्हा उपाध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले.

ही स्पर्धा संघटनेचे अध्यक्ष सल्लाऊदिन अन्सारी, सचिव संदीप गाडे, संदीप वाघचौरे, खजिनदार पंच कमिटी प्रमुख अनुप देटे, कैलास लबडे पाटील, हरिदास गोविंद यांनी आयोजित केली होती. उरण तालुक्यातील सुयश प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

### नागपूरच्या कार्तिकचा विश्वविक्रम

## एका तासात मारले तब्बल ३,३३१ पुशअप्स!

**नागपूर : प्रतिनिधी**

उपराजधानीतील २१ वर्षीय कार्तिक जायस्वालने अवघ्या एका तासात तब्बल ३,३३१ पुशअप्स मारून नवा विश्वविक्रमाची नोंद केली आहे. या विक्रमी कामगिरीची नोंद लवकरच गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सर्समध्ये होणार आहे. सीताबर्डी येथील विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात बुधवारी (दि. १५) आयोजित या उपक्रमात कार्तिकने आपल्या फिटनेसचा परिचय देत तासाभरात तीन हजार पुशअप्स मारून नव्या विश्वविक्रमाला गवसणी घातली.

कार्तिकची विश्वविक्रमी कामगिरी जवळून पाहण्यासाठी सभागृहात मोठी गर्दी जमली होती. यापूर्वीचा जागतिक किर्तीमान ऑस्ट्रेलियाचा खेळाडू डॅनियल स्कालीच्या नावावर होता, जो आता इतिहासजमा होणार आहे. डॅनियलने तो विश्वविक्रम याच वर्षी नोंदविला होता. उल्लेखनीय म्हणजे, कार्तिकने याआधीसुद्धा एका मिनिटात सर्वाधिक टाईल्स फोडण्याचा विक्रम केलेला आहे.

एमएमए फायटर भारत आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर असलेला कार्तिक या विक्रमासाठी गेल्या पाच वर्षांपासून कसून तयारी करीत होता. तो दररोज सहा तासांपेक्षा अधिक वेळ सराव करायचा, शिवाय दोन वर्षांपासून जिममध्ये विशेष प्रशिक्षण घेत होता. त्याचवेळी एक तास ध्यानही करायचा. डॅनियलने त्याचा विक्रम कुणीही मोडू शकणार नाही, असे आव्हान दिले होते. कार्तिकने हे अवघड आव्हान स्वीकारत तयारी सुरू केली होती. डॅनियलचा विक्रम मोडीत काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची घोषणा कार्तिकने काही महिन्यांपूर्वी केली होती. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कार्तिकने हे असाध्य साध्य करून दाखविले. या विश्वविक्रमी कामगिरीबद्दल कार्तिकने आनंद व्यक्त केला आहे.

## जान्हवीला पॉवर लिफ्टिंगमध्ये सुवर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**



धारावीतील जान्हवी शैलेश काळेने महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशन आयोजित पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत औरंगाबाद येथे जिल्हा पातळीवर सुवर्णपदक पटकावले. ती परळ येथील सर्व्हिस लीग व्यायामशाळेची सदस्य आहे. जुलै २०२२ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. ती हराळे सेवा संघाचे कार्याध्यक्ष जनार्दन कांबळे यांची नात आहे.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**